वर्ष : ०५ | अंक: ०२ | मुंबई, मंगळवार ४ डिसेंबर २०१८ ते १० डिसेंबर २०१८ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

Website: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

# पोलीस बातमी पत्र

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 मराठा आरक्षण खासगी उद्योगांतही ?

3 → वसईत १५६ अनधिकृत बांधकामे पाडली

राज्यातील ८२ लाख शेतकरी दुष्काळाच्या छायेत ← 4

# फडणवीस–उद्धव एकत्र युतीचा 'नगारा' वाजला!



**वाशिम – मराठा आरक्षण लागू झाल्यानंतर भाजपमधील दुरावा कमी होताना दिसत आहे. रविवारी वाशिम येथे एका कार्यक्रमाच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे एकाच व्यासपीठावर आले. व्यासपीठावर दोन्ही नेत्यांनी एकत्रितपणे नगारा वाजवलाच, शिवाय भाषणातही एकमेकांची तोंडभरून स्तुती केली. विशेष म्हणजे, कार्यक्रमस्थळी जात असताना मुख्यमंत्र्यांनी प्रोटोकॉलला बगल देवून उद्धव ठाकरे यांच्यासोबत एकाच गाडीतून प्रवास केला.**

वाशिममध्ये बंजारा समाजाच्या संत सेवालाल मंदिर परिसरात विकासकामांचे सोमवारी भूमिपूजन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे, बालविकास मंत्री पंकजा मुंडे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. या संपूर्ण कार्यक्रमात शिवसेना-भाजपमधील तणाव निवळत असल्याचे पाहायला मिळाले.

उद्धव आणि मुख्यमंत्री फडणवीस या दोन्ही नेत्यांनी यावेळी एकमेकांचे कौतुक केले. मराठा आरक्षण कायदा लागू केल्याबद्दल उद्धव यांनी मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केल्यानंतर मुख्यमंत्र्यांनीही 'उद्धव ठाकरे आमचे मार्गदर्शक आहेत' असे म्हणत मैत्रीचा 'सेतू' बांधला.

### बंजारा अकादमी उभारणार

मुख्यमंत्र्यांनी बंजारा भाषेत भाषणाची सुरुवात करून उपस्थितांची मने जिंकली. बजारा समाजाच्या सर्व समस्या सोडवण्यासाठी आमचे सरकार कटिबद्ध असल्याचे आश्वासन यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले. सेवालाल महाराजांचे जागतिक दर्जाचे स्मारक उभारण्यात येईल व या स्मारकासाठी उर्वरित १०० कोटी रुपये निधीची तरतूदही लवकरच करण्यात येईल असे आश्वासन यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले. बंजारा संस्कृतीचे जतन करण्यासाठी बंजारा अकादमी उभारण्यात येईल, असे आश्वासनही मुख्यमंत्र्यांनी दिले. तर 'प्रत्येकाला सन्मानानं जगण्याचा अधिकार आहे. बंजारा समाज हा लढवय्या समाज आहे. या समाजाला आपण शिक्षणाची सुविधा दिली तर ते देशाचा आधारस्तंभ होतील.




# गोहत्येच्या संशयावरून उद्रेक दोन ठार



**बुलंदशहर (उत्तर प्रदेश) - गोहत्येच्या संशयावरून उत्तर प्रदेशातील बुलंदशहरात हिंसक आंदोलन सुरू आहे. आंदोलनकर्त्यांनी रस्त्यावर उतरून वाहनांची तोडफोड केली. पोलीस स्टेशनवर दगडफेक करीत हल्ला केला. पोलीस स्टेशनबाहेरील पोलिसांची गाडी पेटवून दिली. पोलीस स्टेशनवर केलेल्या गोळीबारात एका पोलीस निरीक्षकाचा आणि अन्य एकाचा मृत्यू झाला आहे.**

बुलंदशहरमधील एका गावात गोहत्या केल्याची अफवा पसरली. गोहत्येच्या संशयावरुन आंदोलनकर्त्यांनी रस्त्यावर उतरून हिंसक आंदोलन केले. पोलिसांना या घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलीस आणि आंदोलनकर्त्यांमध्ये जोरदार चकमक झाली. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी गोळीबार केला. यात एक तरुण जखमी झाला. तरुण जखमी झाल्याची बातमी पसरताच जमावानं पोलीस स्टेशनवर हल्ला केला. या हल्ल्यात पोलीस निरीक्षक सुबोध कुमार सिंह यांचा मृत्यू झाला. आंदोलनकर्त्यांनी हिंसक आंदोलन केले. पोलीस स्टेशनच्या बाहेर उभी असलेली पोलिसाची गाडी पेटवून दिली. पोलिसांवर दगडफेक केली. जमावामधून पोलीस स्टेशनवर गोळीबार केला. या गोळीबारात सुबोध कुमार सिंह यांचा मृत्यू झाला. बुलंदशहरमध्ये प्रचंड तणाव असून या ठिकाणी मोठा पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.

# गुजरातनंतर आता महाराष्ट्रातूनही ब्राह्मण आरक्षणाची मागणी

**मुंबई** - मराठा आरक्षणाचा मार्ग मोकळा झाल्यानंतर आता ब्राह्मण समाजालाही आरक्षण देण्यात यावे अशी मागणी ब्राह्मण महासंघाचे आनंद दवे यांनी केली आहे. ब्राह्मण समाजाला जातीवर नव्हे तर आर्थिक निकषांवर



आरक्षण देण्यात यावे, असे त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे गुजरातनंतर आता महाराष्ट्रातूनही ब्राह्मण आरक्षणाची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, महसूलमंत्री

उर्वरित पृष्ठ 2 वर





ठाणे ग्रामीण पोलीस अधिक्षक शिवाजी राठोड यांना पोलीस बातमी पत्रचे पत्रकार यांनी ठाणे ग्रामीणमध्ये चोरीला गेलेला मुद्देमाल्या हस्तांतर सोहळयाच्या आयोजित कार्यक्रात सोन्याचे दागीने, दुचाकी, चारचाकी परत मिळवून दिल्याबद्दल स्वागत करण्यात आले.

ठाणे ग्रामीण पोलीस अधिक्षक शिवाजी राठोड यांनी पोलीस बातमी पत्रास शुभेच्छा दिल्या

# राजकीय पक्षांना मराठी एकीकरण समितीचा दणका

मराठी एकीकरण समितीच्या मार्गदर्शनानुसार , स्वराज्य प्रतिष्ठानच्या पुढाकाराने, संपुर्ण ग्रामस्थांनी एकत्र येऊन कांदळे बेलवाडी (चिंचवली तर्फे अंतोन ) येथे वर्षानुवर्षे चाललेली दहशत संपवण्यात मोठे यश मिळवलेले आहे.

गेल्या पंचायत निवडणूकीत १०० % ग्रामस्थांनी एकजूटीचे प्रदर्शन करत, सर्व राजकीय पक्षांना झुगारुन, बिनविरोध अपक्ष लोकप्रतिनिधी निवडून आणले. हा आपल्या अभूतपूर्व लोकशाहीचा विजय आहे. व संपूर्ण देश पातळीवर नोंद घ्यावी; असे उस्फूर्त जनजागृतीचे उदाहरण आहे.

या वर्षीच्या काळभैरव जन्मोत्सव प्रसंगी, या सामाजिक व राजकीय क्रांतीकरीता परीश्रम घेणाऱ्या कार्यकर्त्यांचा व मार्गदर्शकांचा विशेषतः मराठी एकीकरण समितीचे प्रदिप सामंत, गोवर्धन देशमुख, क्रिष्णा जाधव , महेश पवार यांचा सत्कार करुन समस्त ग्रामस्थांतर्फे कृतज्ञता व आभार प्रदर्शन करण्यात आले.


दि. २९ व ३० नोव्हेंबर या दिवशी ग्रामस्थ व मंदिर व्यवस्थापनातर्फे बाळ गोपाळांसाठी क्रिडा, निबंध , कला स्पर्धा , काळभैरवाची पूजा, किर्तन , पालखी असे भरगच्च कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यात आले. शिवाय लवकरच काळभैरवाच्या मंदिराचा जिर्णोध्दार करण्याचा संकल्प स्वराज्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रमोद पार्टे यांनी जाहीर केला.

# ठाणे ग्रामीण पोलिसांचा आगळा वेगळा कार्यक्रम

## मिरा भाईदर येथे मुद्देमाल हस्तांतरण सोहळा





ठाणे ग्रामीण जिल्हयात विविध पोलिस स्टेशनला मालमत्तेच्या सदाराखाली दाखल गुन्हयातील जप्त करण्यात आलेल्या मुद्देमाल वितरण सोहळा दिनांक २७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४.०० वाजता भाईदर मक्सेस मॉल येथे संपन्न झाला. उपविभागीय पोलिस अधिकारी शांताराम दळवी यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी ठाणे ग्रामीण चे पोलिस अधिक्षक शिवाजी राठोड अध्यक्षस्थानी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे विशेष वैशिष्ठ म्हणजे ठाणे ग्रामीणच्या हद्दीत नेहमी होणारे छोटे मोठे गुन्हे ,ज्यामध्ये चेन खेचने , वाहने चोरुन नेणे, घरफोडी , हत्याराचे धाक दाखवून सोने मुद्देमाल काढून घेणे अशाप्रकारच्या गुन्हयामध्ये चोरीला गेलेला ऐवज लवकरात लवकर मिळवून देण्यासाठी तत्पर पोलिस दलाचे सर्व जनतेकडून स्वागत करण्यात येते. ठाणे ग्रामीण पोलिस अधिक्षक शिवाजी राठोड यांच्या मार्गदर्शनाने त्याचप्रमाणे सहाय्यक पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी व त्यांचे धाडसी पथक यांच्या अथक प्रयत्नाने मिरा भाईदर मधील गुन्हेगारीला आळा बसला आहे. यावेळी ज्या माणसांचे दागदागिने

उर्वरित पृष्ठ 2 वर



# अवैध बांधकामांना संरक्षण



**मुंबई** - इमारतींमधील घरांमध्ये १ जानेवारी, २०१६पूर्वी करण्यात आलेले अंतर्गत बदल, वाढीव बांधकामे, दुकानांसमोरील सज्जा व अन्य बांधकामे तसेच गावठाणे, कोळीवाड्यांमधील अवैध बांधकामे शुल्क आकारून अधिकृत करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मुंबई महापालिका घेणार आहे. राज्य सरकारच्या सूचनेनुसार हा निर्णय पालिका घेत असून, त्याबाबतचा प्रस्ताव लवकरच सुधार समितीत मंजुरीसाठी मांडला जाणार आहे. पालिकेच्या या निर्णयामुळे २३ ते २५ हजार अवैध बांधकामे कायम होऊन इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना दिलासा मिळणार आहे.

राज्य सरकारने एका अधिसूचनेनुसार ३१ डिसेंबर, २०१५पर्यंत म्हणजेच १ जानेवारी, २०१६पूर्वीची मुंबईतील गावठाणे, कोळीवाडे व इमारतींमधील अवैध बांधकामे वैध करण्याचे आदेश जारी केले होते. हा निर्णय पालिकेने स्वत:च्या स्तरावर घेण्याचे निर्देश सरकारने दिले असून, त्यानुसार पालिका प्रशासनाने प्रस्ताव बनवण्याची प्रशासकीय तयारी सुरू केली आहे. पालिकेच्या हद्दीत अधिकृत इमारतींमध्ये सुमारे २० ते २५ हजार अवैध पक्की बांधकामे आहेत. यामध्ये घरांमध्ये करण्यात आलेल्या बदलांसह, वाढीव बांधकामे व अन्य बांधकामांचा समावेश आहे. यातील अनेक प्रकरणे न्यायप्रविष्ट असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करणे शक्य होत नाही. तसेच या बांधकामांवर कारवाई करण्याइतकी यंत्रणा पालिकेकडे नाहीत. त्यामुळेच अखेर नियमावली तयार करून शुल्क आकारून अधिकृत करण्याचा अधिकार महापालिकेस देण्यात आला आहे.

# मराठा आरक्षण खासगी उद्योगांतही?

## सवलती, नूतनीकरण करारात अट घालण्याची कायद्यात तरतूद

**मुंबई - राज्यातील शासकीय-निमशासकीय सेवेतील पदांबरोबरच शासनाच्या विविध प्रकारच्या आर्थिक सवलती घेणाऱ्या खासगी उद्योगांनाही मराठा आरक्षण कायदा लागू होणार आहे. उद्योग वा आस्थापनांना काही सवलती देत असताना किंवा कराराचे नूतनीकरण करताना, मराठा आरक्षण लागू करण्याची अट घालण्याची तरतूद या कायद्यात करण्यात आली आहे.**

खासगी उद्योगांबरोबरच राज्य शासनाचे भागभांडवल असणारे साखर कारखाने, बँका, सूतगिरण्या आणि अन्य सहकारी संस्थांमध्ये मराठा आरक्षण लागू होणार आहे. राज्यातील अभिमत विद्यापीठे आणि खासगी विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांचे प्रवेश आणि त्यांच्या आस्थापनांतील नोकरभरतीही मराठा आरक्षण कायद्याच्या कक्षेत आणण्यात आली आहे.

राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग असा स्वतंत्र



प्रवर्ग तयार करून मराठा समाजाला शासकीय, निमशासकीय सेवेत तसेच शासकीय, अनुदानित आणि खासगी शिक्षण संस्थांमधील प्रवेशात १६ टक्के आरक्षण लागू करण्यासाठी कायदा करण्यात आला. राज्यपालांनी त्यावर शुक्रवारी मान्यतेची मोहोर उमटवल्यानंतर, राज्यात या कायद्याची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. मराठा आरक्षण कायदा फक्त शासकीय आणि निमशासकीय सेवा किंवा शिक्षण संस्थांपुरता मर्यादित न ठेवता, मर्यादित स्वरूपात का होईना, खासगी उद्योग, आस्थापनांपर्यंत त्याची व्याप्ती वाढविण्यात आली आहे.

### कायद्यात काय?

सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) आरक्षण अधिनियम म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या कायद्यात मराठा आरक्षण कुठे कुठे लागू होते, त्याची तरतूद व स्पष्टीकरण देण्यात आले आहे. कलम २ (ड) मध्ये आस्थापनाची व्याख्या केली आहे. त्यात शासनाचे किंवा त्या वेळी अमलात असलेल्या राज्य विधिमंडळाच्या कोणत्याही अधिनियमाद्वारे स्थापन केलेल्या स्थानिक प्राधिकरणाचे किंवा सांविधानिक प्राधिकरणाचे कोणतेही कार्यालय किंवा विद्यापीठ किंवा जिच्यातील भागभांडवल शासनाने धारण केले आहे, अशी कंपनी किंवा महामंडळ, सहकारी संस्था अथवा शासकीय अनुदानप्राप्त संस्था, असे नमूद करण्यात आले आहे. त्याच्या स्पष्टीकरणात असे म्हटले आहे की, शासनाचे अनुदानप्राप्त संस्था या शब्दप्रयोगात ज्या संस्थांना किंवा उद्योगांना एक तर हा अधिनियम अमलात येण्यापूर्वी अथवा त्यानंतर शासनाकडून सवलतीच्या दरात जमिनीच्या स्वरूपात किंवा इतर कोणत्याही आर्थिक सवलतीच्या स्वरूपात साहाय्य देण्यात आलेले आहे किंवा शासनाकडून ज्यांना मान्यता देण्यात आली आहे, परवाना देण्यात आला आहे, ज्यांचे पर्यवेक्षण करण्यात आले आहे.

# म्हाडा घरांच्या किमती १० टक्के कमी?

**मुंबई** - म्हाडाच्या अखत्यारीत येणाऱ्या मुंबई गृहनिर्माण मंडळाच्या १,३८४ घरांसाठी १६ डिसेंबरला सोडत जारी होणार असून उच्च उत्पन्न गट वगळता अत्यल्प, अल्प आणि मध्यम गटातील घरांच्या जाहिरातीत दिलेल्या किमतीत १० टक्क्यांनी कपात करण्यात येणार आहेत. ११ डिसेंबर रोजी होणाऱ्या प्राधिकरणाच्या बैठकीत यावर शिक्कामोर्तब होईल, अशी माहिती मुंबई गृहनिर्माण मंडळाचे सभापती मधू चव्हाण यांनी दिली.

म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या लॉटरीतील अत्यल्प गटातील घरांच्या किमती १४ ते २० लाख तर अल्प गटातील घरांच्या किमती या २० ते ३५ लाखांपर्यंत आहेत. मध्यम गटातील घरांच्या किमती ३५ ते ६० लाख आहेत. म्हाडाच्या नव्या धोरणानुसार घरांच्या किमती २० ते २५ टक्क्यांनी कमी केल्यानंतरही अल्प, अत्यल्प व मध्यम गटांच्या घरांच्या किमती जास्त असल्याचा सूर होता.

त्यामुळे या किमती दहा टक्क्यांनी कमी करण्याबाबत चव्हाण यांनी म्हाडाचे अध्यक्ष उदय सामंत यांना पत्र लिहिले होते. या पत्राची दखल घेत किमतीसंदर्भात अभ्यास करून आता म्हाडाच्या घरांच्या किमती आणखी कमी करण्यासंदर्भात अंतिम निर्णय ११ डिसेंबरला घेण्यात येणार आहे. अत्यल्प, अल्प आणि मध्यम गटातील ज्या अर्जदारांना सोडतीत म्हाडाचे घर लागेल त्यांच्याकडून लॉटरीत जाहीर झालेल्या आताच्या किमतीपेक्षा १० टक्के रक्कम कमी वसूल करण्यात येईल, अशी माहितीही यावेळी मुंबई गृहनिर्माण मंडळाचे सभापती चव्हाण यांनी पत्रकारांना दिली.

# मुंबई ते दूबईपर्यंत पाण्याच्या खालून धावेल ट्रेन...



**नवी दिल्ली-** भविष्यात भारत ते दुबईचा प्रवास सोपा होणार आहे. दुबई ते मुबंई पाण्याखालून ट्रेनचा विचार केला जात आहे. या अंडरवॉटर रेल्वे योजनेने फक्त नागरिकांनाच याचा लाभ होणार नाही तर, दोन्ही देशातीन व्यापारात वाढ देखील होणार आहे. दुबईच्या एका वृत्तपत्रात सांगण्यात आले आहे की, अबू धाबीत झालेल्या यूएई-इंडिया कॉनक्लेव दरम्यान नॅशनल अॅडव्हायजर ब्यूरो लिमिटेडचे मॅनेजिंग डायरेक्टर आणि चीफ कंसल्टंट अब्दुल्ला अलशेही यांनी या गोष्टीला दुजोरा दिला आहे. हायपरलूप आणि ड्रायवरलेस फ्लाइंग कारनंतर यूएई भविष्यात भारतासोबत या महत्वाच्या प्रोजेक्टवर विचार करणार आहे.

***रेल्वे नेटवर्क अंदाजे २००० किलोमीटरचा असेल***

जर सगळ सुरळीत पार पडलं तर तुम्ही भविष्यात पाण्याखालून ट्रेनने आंतराष्ट्रीय प्रवास करू शकणार आहात. या प्रोजेक्टमध्ये भारत ते दुबईच्यामध्ये सध्या २००० किलोमीटरच्या रेल्वे लाइनचा विचार केला जात आहे.

***अनेक देशांना होईल याचा फायदा***

अलशेही कंसल्टंट फर्म नॅशनल अॅडवाइज ब्यूरो लिमिटेडचे फाउंडर आहेत. ते यूएई-इंडिया कॉनक्लेव्ह दरम्यान म्हणाले, 'सध्या आम्ही यावर विचार करत आहोत. आम्ही भारतीय शहर मुंबईला फूजेरासोबत पाण्याखालून ट्रेन नेटवर्कने जोडण्याचा विचार करत आहोत. यामुळे दोन्ही देशातील व्यापारात वाढ होईल. यामुळे भारताला तेल मिळेल आणि आम्हाला पाणी मिळेल. यामुळे इतर देशांनाही याचा फायदा होणार आहे.'

***स्टडी केली जाईल***

दुबई ते मुंबईच्यामध्ये अंडरवॉटर रेल्वे प्रोजेक्टवर स्टडी केली जाईल. जर सगळे ठिक झाले तर लवकरच यावर काम सुरू केले जाईल. जगभरात अनेक ठिकाणा असा प्रोजेक्टवर काम सुरू आहे.

# JIO च्या ग्राहकांना खुशखबर.. डिसेंबर २०१९ पर्यंत रिचार्ज न करता करा फ्री कॉलिंग आणि डेटा यूज

**मुंबई-** Jio ने आपल्या ग्राहकांसाठी कॅशबॅक ऑफर सादर केली आहे. ऑफरनुसार ग्राहकाला कोणत्याही रिचार्जवर १०० टक्के कॅशबॅक मिळेल. या कॅशबॅक ऑफरचा लाभ ग्राहक My व्द अॅपवरून घेऊ शकतात. ग्राहकांनी सगळ्यात आधी आपल्या स्मार्टफोनवर My Jio अॅप डाऊनलोड करावे. त्यावर लॉग इन करावे. नंतर ते ओपन करून Recharge ऑप्शनवर




क्लिक करावे. यानंतर आपला आवडीचा रिचार्ज प्लान निवडून त्यावर क्लिक करावे. नंतर Buy हे बटन दाबावे. दरम्यान, कॅशबॅक व्हाऊचरसाठी मॅन्युअली अप्लाय करावे लागेल. यासाठी Apply Discount Voucher वर क्लिक करावे. नंतर व्हाऊचर सिलेक्ट करून USE IT हे बटन दाबावे. यादरम्यान तुम्हाला पेमेंट ऑप्शन दिसेल. तुम्ही हवा तो पेमेंट ऑप्शन निवडून ट्रान्झॅक्शनची प्रक्रिया करू शकतात.

# मुंबईतील वीजबिलांवरून राजकीय स्टंटबाजी

## कॉँग्रेस, मनसे, शिवसेनेनंतर भाजपलाही जाग, बेस्टच्या दिरंगाईवर सोयीस्कर मौन

**मुंबई** - राज्य वीज नियामक आयोगाने सप्टेंबर २०१८ मध्ये मंजूर केलेल्या वीजदरवाढीवरून मुंबईत राजकीय पक्षांचा निवडणूक वर्षांत होणारा पंचवार्षिक जागरण गोंधळ सुरू झाला आहे. मुंबईत अदानी इलेक्ट्रिसिटीला लक्ष्य करत काँग्रेस-मनसेने वीजग्राहकांसाठी आंदोलन केले. त्यानंतर शिवसेनेने विधान परिषदेत दरवाढीचा विषय करत ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून चौकशीचे आश्वासनही मिळवले. त्यानंतर आता मुंबई भाजपनेही या वादात उडी घेतली असून मुंबई भाजपचे अध्यक्ष आशीष शेलार यांच्या तक्रारीवरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अदानीच्या वीजबिलांच्या तक्रारीची चौकशी करण्याचा आदेश दिला आहे.

वीज आयोग प्रत्येक आर्थिक वर्षांसाठी वीजदरवाढ मंजूर करते. त्यानुसार सप्टेंबरमध्ये मुंबईतील अदानी, टाटा यांना वीजदरवाढ तर बेस्टला वीजदरात कपात करण्याचा आदेश वीज आयोगाने दिला. महावितरणचीही त्या वेळी दरवाढ झाली. पण सर्व राजकीय पक्ष त्या वेळी उदासीन राहिले. आता वीजदेयके आल्यानंतर निवडणुकांच्या तोंडावर मुंबईत अदानी इलेक्ट्रिसिटीच्या वीजदरांवरून गेल्या काही दिवसांत मुंबई काँग्रेस, मनसेने अदानीविरोधात आंदोलन



केले. त्यानंतर शिवसेनेचे आमदार अनिल परब यांनी हा विषय विधान परिषदेत उपस्थित केला. त्यावर मुंबईत अदानी इलेक्ट्रिसिटीची कसलीही वीज दरवाढ राज्य वीज नियामक आयोगाने आता मंजूर केलेली नाही. त्यामुळे मुंबईत अदानीकडून वीजबिलात अतिरिक्त शुल्क आकारण्यात आलेले नाही. मात्र, तरीही या कंपनीकडून ग्राहकांच्या वीज बिलात नियमबाह्य पैसे आकरले गेल्याची तक्रार असेल तर बैठक घेऊन सखोल चौकशी करण्याचे आणि आरोपात तथ्य आढळल्यास अतिरिक्त पैसे ग्राहकांना परत देण्यात येतील, असे ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जाहीर केले होते. काँग्रेस-मनसेसह शिवसेनेनेही या प्रकरणात उडी घेतल्यानंतर मुंबई भाजपलाही जाग आली. मुंबई उपनगरात वीजवितरण करणाऱ्या अदानी कंपनीकडून अचानक वीज देयकात ५० ते १०० टक्के वाढ करण्यात आल्याच्या लोकांच्या तक्रारी आल्या आहेत. मीटर न तपासताच वीजदेयके दिल्याचे ग्राहकांचे म्हणणे आहे. त्यामुळे अदानीकडून गेल्या तीन महिन्यांत देण्यात आलेल्या देयकांचे ऑडिट करण्यात यावे. राज्य ऊर्जा विभाग अधिकारी, तज्ज्ञ, ग्राहक संघटना आदींची समिती गठित करून आकस्मिक वाढ प्रकरणाची तपासणी करावी. समितीचा अहवाल तीन महिन्यांत जनतेसमोर मांडण्यात यावा, अशा मागण्या या पत्रात आमदार आशीष शेलार यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्रात केल्या. त्यावर चौकशीचा आदेश मुख्यमंत्र्यांनी दिला आहे.

# २०२२ पर्यत ६० लाख झोपडीवासीयांना घरे उपलब्ध करून देण्याचे दिवास्वप्न



**मुंबई : राज्य शासनाने २०१७च्या पूर्वार्धात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए)च्या सर्व नोंदी आणि ऑनलाइन संमतीचे डिजिटायझेशन सादर करण्याची घोषणा केली होती. मात्र लाल फितीच्या कारभारात डिजिटायझेशन रखडल्याचे चित्र आहे. त्यामुळे २०२२ पर्यत ६० लाख झोपडपट्टीवासीयांना घरे उपलब्ध करून देण्याचे सरकारचे उद्दिष्ट दिवास्वप्नच ठरू पाहत आहे.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या या उपक्रमात झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांना गती यावी तसेच प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता यावी, हा उद्देश होता. मात्र एसआरए समितीने या दिशेने अंमलबजावणी केलेली दिसत नाही.

एसआरएमधील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, झोपडपट्टी शिखर समितीने अलीकडेच 'आसरा' या अॅपची निर्मिती केली. ऑनलाइन प्रकल्पांसाठी व पात्रता संमतीसाठी पूर्णपणे संवादात्मक खिडकी (इंटरअॅक्टिव्ह विंडो) निर्माण करण्याचा या अॅपचा उद्देश होता. सध्या या अॅपच्या माध्यमातून झोपडपट्टी रहिवाशांच्या चालू स्थितीची माहिती, एसआरए योजनांची माहिती, लेटर ऑफ इंटेन्ट इत्यादी मर्यादित सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मात्र, राज्य शासनाच्या 'आपले सरकार'कडून साह्य मिळविण्यात अडथळा येत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

मुंबई महानगरपालिका, तहसीलदार कार्यालय, म्हाडा, बेस्ट आणि खासगी वीज समित्या, निवडणूक समित्या अशा सरकारी यंत्रणांसोबत पात्रतेसाठी कोणताही डिजिटाइज इंटरफेस वापरण्यात एसआरए समिती कमी पडताना दिसत आहे. म्हणूनच यासंदर्भातील सर्व प्रक्रिया पारदर्शक करण्यासाठी एसआरए डिजिटल मंचासोबत जोडण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे.

# वाढत्या वीज बिलांचा प्रश्न सुटणार

## *ई-मेलला २४ तासांच्या आत मिळणार उत्तर*

**मुंबई :** ऑगस्ट महिन्यासह सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यांत वाढीव वीज बिले आल्याच्या तक्रारी करत वीज ग्राहकांनी 'अदानी'च्या नावाने बोटे मोडली. विशेषत: अव्वाच्या सव्वा वीज बिले आल्याने ग्राहकांच्या बाजूने राजकीय पक्षांनी आंदोलने छेडली. या सर्व प्रकारानंतर आता अदानीने वीज ग्राहकांच्या समस्या समजावून घेत त्या सोडविण्याचा निर्धार केला आहे. यासाठी हेल्पलाइन, ई-मेल आणि शिबिरे भरविण्यात येत असून, वीज ग्राहकांच्या सर्व समस्या सोडविल्या जाणार आहेत.

बिलिंगसंबंधी प्रश्नांची दखल घेण्यासाठी १-१५ डिसेंबरदरम्यान कांदिवली, भाईंदर, वांद्रे, चेंबूर, गोरेगाव, एमआयडीसी अंधेरी, अंधेरी पश्चिम आणि साकी नाका अशा आठ ठिकाणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. वीज ग्राहकांनी येथे दाखल होताना सोबत वीज बिल ठेवायचे आहे. वीज बिलांबाबत ग्राहकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रतिसाद म्हणून दिवसाचे २४ तास आणि आठवडाभर अखंडपणे सुरू असलेली १९१२२ ही हेल्पलाइन कार्यान्वित करण्यात आली आहे.

याशिवाय ई-मेल आयडी कार्यान्वित करण्यात आला आहे. याद्वारे वीज ग्राहकांचे प्रश्न सोडविले जाणार आहेत. २४ तासांच्या आत ई-मेलला उत्तर



दिले जाणार आहे. शिबिरांमध्ये ग्राहकांचे बिलिंगसंबंधी प्रश्न समजून घेऊन, त्यांचे निराकरण केले जाईल.

### येथे होणार विशेष शिबिरांचे आयोजन

* कांदिवली - शंकर लेनचे जंक्शन, एस.व्ही. रोड, कांदिवली -पश्चिम.
* भाईंदर - पवन पुत्र बिल्डिंग, घोडदेव फाटक 'रेल्वे क्रॉसिंगजवळ', काशी मीरा रोड, भाईंदर.
* वांद्रे - आरएनए कॉर्पोरेट पार्क, जुने कला मंदिर, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, वांद्रे -पूव.
* चेंबूर - सहकार सिनेमाजवळ, टिळकनगर रोड नंबर. ३, चेंबूर.
* गोरेगाव - वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे, दिंडोशी, गोरेगाव - पूव.
* अंधेरी - पूर्व - प्लॉट क्रमांक ई-४, एमआयडीसी क्षेत्र, मरोळ, अंधेरी - पूर्व
* अंधेरी - पूर्व - ए. के. रोड, पार्क डेव्हिसजवळ, साकी नाका, अंधेरी - पूर्व
* अंधेरी - पश्चिम - उषा किरण इमारत, नाडको मार्केटजवळ, एस. व्ही. रोड, अंधेरी - पश्चिम

# तंबाखूचा विळखा अधिक जीवघेणा

**मुंबई** - तंबाखू आणि धूम्रपानामुळे होणारे मृत्यू २०१७मध्ये वेगाने वाढल्याचा महत्त्वपूर्ण निष्कर्ष 'लॅन्सेट' या वैद्यकीय जर्नलमधील अहवालात देण्यात आला आहे. २००७च्या तुलनेत २०१७मध्ये तंबाखूमुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण ११.२ टक्क्यांनी वाढले आहे. भारतासह अन्य १९४ देशांमध्ये धूम्रपान आणि तंबाखूसेवनामुळे जीवनशैलीचा दर्जा अधिकाधिक खालावत असल्याची बाबही यातून समोर आली आहे. तंबाखूचे पर्यावरण, वर्तणूक आणि जैविक पातळीवर कोणत्या प्रकारचे परिणाम दिसतात, याचा विस्तृत अभ्यास या अहवालामध्ये करण्यात आला होता. तंबाखूसह धूम्रपान करण्याच्या सवयीमुळे कमी वयातच अनेकांना जीव गमवावा लागल्याचे यातून समोर आले आहे.



धूम्रपानामुळे २०१७मध्ये झालेल्या मृत्यूचे प्रमाण हे २००७च्या तुलनेमध्ये ११.२ टक्क्यांनी वाढल्याच्या धक्कादायक वास्तवावर हा अहवालाने प्रकाश टाकला आहे. पाहणी केलेल्या १९५ देशांमध्ये धूम्रपान हे मृत्यूचे दुसऱ्या क्रमांकाचे प्रमुख कारण ठरले आहे. १९९०मध्ये धूम्रपान हे मृत्यूसाठी चौथ्या क्रमाकांचे कारण होते. आता ते दुसऱ्या क्रमाकांवर आले आहे. तंबाखूमुळे आरोग्यदायी जीवनशैलीमध्येही वेगाने फरक पडला आहे. तंबाखूमुळे पुरुषांमध्ये अपंगत्व येण्याचे व मृत्यूचे प्रमाण २०१७मध्ये ७१ लाख इतके आहे, तर १८ कोटी २० लाख व्यक्तींच्या जीवनशैलीवर धूम्रपान आणि तंबाखू या दोन्ही गोष्टींचा परिणाम झाला आहे. २०१७मध्ये झालेल्या मृत्यूपैकी १६ लाख २० हजार मृत्यू हे धूम्रपानामुळे श्वसनविकाराशी संबंधित वेगवेगळ्या आजारांनी झाले होते. फुफ्फुसाच्या कर्करोगामुळे ११ लाख ९० हजार, तर पक्षाघातामुळे ८ लाख ८७ हजार जणांना जीव गमवावा लागला होता.

***तंबाखूविक्रीवर हवेत निर्बंध***

तंबाखू आणि धूम्रपानाचे शरीरावर घातक परिणाम होतात. त्यामुळे कर्करोग होण्याचे प्रमाण झपाट्याने वाढते आहे. त्यामुळे या उत्पादनांच्या विक्रीवर कडक निर्बंध आणण्याची मागणी जोरदारपणे लावून धरण्याची गरज या देशांतील कर्करोग तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

-----------(पृष्ठ १ वरुन)-----------

# गुजरातनंतर आता महाराष्ट्रातूनही ब्राह्मण आरक्षणाची मागणी

चंद्रकांत पाटील यांनी ब्राह्मण आरक्षणाचा अहवाल मागासवर्ग आयोगाकडे पाठवणार असल्याचे सांगलीत बोलताना सांगितले. ग्रामीण भागात राहणारा ब्राह्मण समाज हा आर्थिकृष्ट्या मागासलेला आहे. त्यामुळे राज्य मागासवर्ग आयोगाने ब्राह्मण समाजाच्या आरक्षणाचा विचार करावा. त्यासाठी या समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचे सर्वेक्षण करावे, यामध्ये ब्राह्मण समाजाचे मागासपण सिद्ध झाल्यास त्यांनाही आरक्षण देण्यात यावे, अशी मागणी दवे यांनी केली आहे.

दरम्यान, जो समाज आरक्षणाची मागणी करेल त्यांचा अहवाल आम्ही मागासवर्ग आयोगाकडे पाठवतो. त्यानुसार, ब्राह्मण समाजाच्या आरक्षणाचा अहवालही आम्ही आयोगाकडे पाठवू असे चंद्रकांत पाटील यांनी म्हटले आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळवून दिल्याबद्दल पाटील यांनी सांगलीत मिरवणूक काढण्यात आली यावेळी ते बोलत होते.

गुजरातमध्ये ब्राह्मण समाजाने आरक्षणाची मागणी केली आहे. येथे या समाजाची लोकसंख्या ९ टक्के इतकी आहे. त्यामुळे इथल्या ब्राह्मणांनी आपला ओबीसींमध्ये समावेश करण्यात यावा या मागणीसाठी इतर मागासवर्ग आयोगाकडे धाव घेतली आहे.

पृष्ठ १ वरुन

# ठाणे ग्रामीण पोलिसांचा आगळा वेगळा कार्यक्रम

## मिरा भाईंदर येथे मुद्देमाल हस्तांतरण सोहळा

दुचाकी वाहने व इतर साहीत्य चोरीला गेले होते त्यांना सर्वांना एकत्र बोलावून एकूण ३२,९८,००० रुपये किमतीचा मुद्देमाल फिर्यादीस ठाणे ग्रामीण पोलिस अधिक्षक शिवाजी राठोड यांच्या हस्ते देण्यात आला. आतापर्यंत च्या कारकीर्दीत मिरा भाईंदरमध्ये झालेला हा आगळा वेगळा सोहळा कौतुकास्पद व पोलिसांचे मनोबल वाढवणारा असा साजरा करण्यात आला. यावेळी वेगवेगळया पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षकतसेच अप्पर पोलिस अधिक्षकसंजय कुमार पाटील उपस्थित होते. अतिशय जलद गतीने चोरांना पकडून आपले गेलेले दागदागिने , दुचाकी वाहने व इतर मुद्देमाल आपल्याला घेताना प्रत्येकनागरिकांच्या डोळयात आनंदअश्रु वाहत होते. आपल्या चोरीला गेलेल्या वस्तू आपल्याला परत मिळणे शक्य नाही अशी खात्री बाळगलेल्या नागरिकांना हा सुखदः आनंद अनुभवायला मिळाला. या कार्यक्रमामुळे ठाणे ग्रामीण पोलिसांचे सर्वत्र कौतुक करण्यात आले.



## संपादकीय...

# उजळल्या दिशा



संपादक:-
दिपक मोरेश्वर नाईक

**मराठा समाजाला शैक्षणिक संस्थांमध्ये तसेच सरकारी आणि निमशासकीय नोकऱ्यांमध्ये १६ टक्के आरक्षण देण्याचा प्रस्ताव महाराष्ट्राच्या विधिमंडळाने एकमताने मंजूर केल्याने एका व्यापक लढ्याला तूर्त सुखद विराम मिळाला आहे. 'मराठा क्रांती मोर्चा' या नावाने मराठा समाजाने लाखालाखांचे ५८ मोर्चे काढले. पहिला मोर्चा ९ मार्च १६ रोजी निघाला. त्यानंतर अडीच वर्षांनी आधी मागासवर्ग आयोगाच्या शिफारसी, त्यानंतर त्याचा कृतिअहवाल, विधिमंडळाचा ठराव, राज्यपालांना मंत्रिमंडळाची शिफारस या क्रमाने ही प्रक्रिया पुरी होते आहे. या नव्या आरक्षणामुळे महाराष्ट्रातील एकूण आरक्षण ६८ टक्के होईल. तामिळनाडूतील आरक्षण ६९ टक्के आहे. महाराष्ट्रात मराठा समाज जवळपास तीस टक्के आहे. हा बहुसंख्य वर्ग शेती आणि शेतीवर आधारित व्यवसायांत गुंतला आहे. संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाल्यानंतर झालेले सत्ताधारी तसेच पश्चिम महाराष्ट्रातील यशस्वी सहकार चळवळीमुळे मराठा समाजाच्या प्रगतीचे जे चित्र निर्माण झाले, ते अपुरे आणि दिशाभूल करणारेही होते. गेले तीन दशके महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या ज्या अव्याहत आत्महत्या होत आहेत, त्यातील बहुसंख्य शेतकरी मराठा आणि कुणबी आहेत. मराठा आंदोलनाच्या निमित्ताने हा विरोधाभास समोर आला, हे एका अर्थाने चांगले झाले. यातून मराठा समाजाचे खरे चित्र जसे इतर समाजाला समजले, तसा मराठा समाजही स्वत:कडे नव्याने पाहू लागला. खरेतर, संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर मराठा समाजाला सामाजिक न्याय देण्याची प्रक्रिया लगेच सुरू होण्याची आवश्यकता होती. तसे तर झाले नाहीच, पण मंडल आयोगाच्या अहवालानंतरही मराठा समाजाला सामाजिक व शैक्षणिक पातळीवर न्याय देण्याची प्रक्रिया वेग घेऊ शकली नाही. संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी शैक्षणिक संस्थांमध्ये निर्माण केलेला 'ईबीसी' म्हणजे आर्थिकदृष्ट्या मागास हा सवलतीसाठीचा स्वतंत्र वर्ग वगळता कोरडवाहू शेती आणि शेतमजुरी करणाऱ्या विशाल मराठा समाजासाठी इतकी वर्षे भरीव काही झाले नाही. विधिमंडळाने आरक्षणाचा प्रस्ताव मंजूर केल्यामुळे मराठा समाजाने एक मोठी लढाई जिंकली आहे. पण खरे युद्ध अजून बाकी आहे. हे समाजाच्या प्रगतीचे दीर्घकाळ चालणारे युद्ध जिंकायचे असेल तर 'मराठा क्रांती मोर्चा'च्या निमित्ताने जाग्या झालेल्या समाजाला शैक्षणिक क्रांतीसाठी, रोजगाराभिमुख प्रशिक्षणासाठी, नव्या आधुनिक शेतीसाठी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या कायमच्या थांबवण्यासाठी लढायला तयार करायला हवे. आज मराठा समाजातील केवळ चार-साडेचार टक्के मुलेमुली उच्चशिक्षित आहेत. प्रशासकीय सेवेतील मराठा टक्का सात-आठ टक्क्यांच्या आतबाहेर आहे. अगदी राज्याची पोलिससेवा घेतली तरी तीस टक्के समाजाचे तेथील प्रतिनिधित्व जेमतेम निम्मे आहे. याहूनही वाईट स्थिती महाराष्ट्रातील विद्यापीठे आणि महाविद्यालये, संशोधनसंस्था पाहिल्या तर दिसेल. येत्या दोन दशकांमध्ये हे चित्र पालटून टाकण्याचा निर्धार या आरक्षणाच्या निमित्ताने समाजाने करायला हवा. शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, विठ्ठल रामजी शिंदे यांनी मराठा समाजाला जी शिक्षणाची आणि आधुनिक दृष्टीची दीक्षा दिली, तिचा नवजागर आता करावा लागेल. तरच या आरक्षणाचा नेमका लाभ उठविता येईल. आरक्षणासाठी मराठा हा स्वतंत्र प्रवर्ग असणार की, वाढीव १६ टक्क्यांसहित तो इतर मागासांच्याच प्रवर्गात सहभागी होणार, हा मुद्दा तांत्रिक आहे. उद्या हे आरक्षण पुन्हा न्यायालयात गेले तर तेथे ते टिकेल, यासाठी आवश्यक ती कायदेशीर तयारी सरकारला करावीच लागेल. सरकारच्या हातात असणारा मागासवर्ग आयोगाचा अहवाल यासाठी उपयुक्त ठरणारा आहे. राज्य सरकारने मराठा आरक्षणाचे पाऊल टाकल्याने धनगर समाजासारख्या इतर समाजांना आपल्या मागण्या मात्र तशाच राहिल्या, असे वाटू शकते. या भावनेचे पडसाद लगेचच विधिमंडळात उमटले. धनगर समाजाचेही समाधान आज ना उद्या करावे लागेल. मात्र, आज या आरक्षणाचा जल्लोष करीत असताना सर्व समाजाने आणि राजकीय वर्गाने लक्षात ठेवण्याची महत्त्वाची बाब म्हणजे, सर्व समाजाला मोफत व सक्तीचे शिक्षण देणे राज्यघटनेने बंधनकारक केले आहे. शिक्षणाची ही गंगा ज्या समाजांच्या, कुटुंबांच्या दारात गेली, त्यांनी एक-दोन पिढ्यांमध्ये भरारी घेतली. नव्या शैक्षणिक आरक्षणाचा असा नेमका लाभ घेतला तर मराठा समाजाचे चित्रही पाहता पाहता बदलून जाईल. एकूण समाजाचा तीस टक्के वर्ग मागास, अशिक्षित आणि तोट्याची शेती करत राहणारा राहिला तर सारा समाज कसा काय पुढे जाणार? त्या दृष्टीने मराठा समाजाच्या अंगणात हा नवा प्रकाश पडतो आहे. त्याने त्याच्या प्रगतीच्या दाही दिशा उजळून जाव्यात!**

# पालक प्रबोधन



मार्क ट्वेन एके ठिकाणी म्हणतो की मी शाळा सोडली. कारण माझ्या असे लक्षात आले की ती माझ्या शिक्षणाच्या फारच आड येते. पुढे जगद्विख्यात झालेल्या या लेखकास असलेली संधी भारतीय विद्यार्थ्यांना मिळाली तर अनेक जण शाळा सोडणेच पसंत करतील. शाळेविषयी ही अशी नकोशी भावना तयार होण्यास दप्तरापासूनच सुरुवात होते. या शाळेतल्या दप्तराचे ओझे कमी होणार, या वार्तेने सर्वात अधिक आनंद होणारच असेल, तर तो लहानग्यांना. हे ओझे कमी करणे पालकांच्या हाती नव्हते आणि शाळांनाही ते शक्य नव्हते. पण अखेर केंद्रीय मनुष्यबळ मंत्रालयानेच यासंबंधीचा फतवा काढल्याने कदाचित काही परिणाम होण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांना दप्तराचा भार आणि पालकांच्या खिशाला शुल्काचा. अशी ही आपल्याकडची स्थिती. त्यामुळे पालक आणि पाल्य दोघेही शाळेवर नाराज. पालकांना पाल्याच्या पाठीवरचे ओझे जाणवत नसेल, पण खिशातल्या शुल्काचा चिमटा मात्र त्यांना जाणवतो. त्यामुळे खासगी शाळांनी किती शुल्क आकारावे, याबाबत गेल्या काही वर्षांत पालकांमध्ये प्रचंड प्रमाणात चर्चा सुरू होती. राज्याच्या विधिमंडळात संमत झालेल्या विधेयकामुळे आता पालकांचा आवाज अधिक बुलंद होऊ शकणार आहे. एकाच दिवशी दप्तराचे ओझे कमी करण्याचा केंद्राचा आणि शुल्क समितीच्या कक्षेत विनाअनुदानित शाळांचाही समावेश करण्याचा राज्याचा निर्णय जाहीर झाल्यामुळे एकूणच शिक्षणक्षेत्राशी संबंधित अनेक विषय पुन्हा एकदा ऐरणीवर आले आहेत.

तथापि यातील एका विरोधाभासाची दखल घ्यायला हवी. प्रत्येकच पालकाला आपल्या मुलाने उत्तम दर्जाचे शिक्षण घ्यावे असे वाटत असते. असे शिक्षण घेतल्यानंतर त्यास उत्तम व्यवसायसंधी असतील आणि त्यातच त्याच्या भविष्याचे सार्थक आहे, असे वाटणाऱ्या पालकांची संख्या सतत वाढतेच आहे. पण त्यासाठी अधिक शुल्क आकारणीस मात्र त्यांचा विरोध असतो. मुलांच्या पाठीवरच्या ओझ्यापेक्षा खिशाला बसणारी झळ त्यांना अधिक महत्त्वाची वाटते. अधिक सोयीसुविधा असणारी शाळा त्यांना हवी असते. पण त्यासाठी अधिक पसे मोजताना मात्र त्यांना त्रास होतो. गेल्या काही दशकांत महाराष्ट्रातील मोठ्या शहरांमध्ये खासगी शाळांचे अक्षरश: पेव फुटले. तेथील शैक्षणिक दर्जा 'सरकारी' शाळांपेक्षा अधिक चांगला असतो, अशी चर्चा सुरू झाल्याने पालकांमध्ये उत्तम शाळा मिळण्यासाठी प्रचंड चढाओढ सुरू झाली. पालकांची गरज ओळखून शाळांनीही मग अनेक नवनवी 'पॅकेजेस' सुरू केली. शिक्षणाबरोबरच अन्य सोयीसुविधांचा पाऊस सुरू झाला. आपल्या पाल्याने सर्वगुणसंपन्न व्हावे, या इच्छेपोटी पोहण्याचा तलाव असणारी किंवा मदान असणारी शाळा पालकांना अधिक उपयुक्त वाटू लागली. निमशहरी आणि ग्रामीण भागांत मात्र याविरुद्ध चित्र दिसते. तेथे खासगी शाळा आणि सरकारी शाळा यातून निवड करण्याचा पर्यायच नसल्याने पाल्यांना उपलब्ध शाळेत शिकणे क्रमप्राप्त ठरते. तेथील अनेक सरकारी शाळा उत्तम असतात. सरकारी शाळांना संपूर्ण अनुदान देऊनही त्यांचा दर्जा सुधारत नाही, ही तक्रार मुख्यत: शहरी भागांत असते. ग्रामीण शाळांकडे शिक्षण खातेही फारसे लक्ष देत नाही. त्यामुळे सरकारी अनुदान नसलेल्या अशा विनाअनुदानित आणि स्वयंअर्थसहायित शाळा यांना आपोआपच प्राधान्य मिळत गेले. शिक्षणाच्या पलीकडे जाऊन कृतीआधारित शिक्षणाची नवी व्यवस्था अशा शाळांमधून सुरू झाली. अनेक उपक्रम राबवण्याच्या नादात विद्यार्थ्यांना अहोरात्र शाळेचा धाक वाढू लागला. 'प्रोजेक्ट्स' नावाची एक भीती त्यामुळे उभी राहिली. त्यानेही दप्तराचे वजन वाढू लागले. शहरी भागांतील पालकांना आपला पाल्य शाळेतून लवकर घरी येणे खरे तर परवडणारे नसते. त्यामुळे शाळा सुटल्यानंतरही त्याच्या गळ्यात दोन-तीन क्लासचे लोढणे अडकवले जाते. सकाळपासून ते संध्याकाळपर्यंत पाल्य घराबाहेर राहणार असल्याने विविध प्रकारचे डबे आणि क्लासचे वेगळे दप्तर यांमुळेही हे ओझे वाढतच गेले. त्यावर ना सरकार अंकुश ठेवू शकत, ना शाळा.

शाळांना या परिस्थितीचा अंदाज आल्याने, मुलांना अधिक वेळ गुंतवून ठेवणाऱ्या योजना निर्माण झाल्या. शाळेतच अनेक उपक्रम सुरू करण्यात आले. त्यातील काही सक्तीचे तर काही ऐच्छिक. पण बहुतकरून सक्तीचेच. मग त्यासाठी वेगळे शुल्क. तेही सक्तीचे. शाळेतील सोयीसुविधांचा हा भार पालकांच्या खिशाला बसू लागला, तेव्हा ओरड सुरू झाली आणि त्यातूनच शिक्षण शुल्क समिती स्थापन करण्यात आली. पालक आणि शिक्षक यांचा समावेश असणाऱ्या या समितीच्या मान्यतेशिवाय शुल्क आकारणे नियमबाह्य ठरवण्यात आले. तरीही या समितीत सगळ्याच पालकांना सहभागी होता येत नसल्याने अनेक पालकांना त्याविरुद्ध काही बोलायची इच्छा असली, तरी तशी सोय नव्हती. आता किमान २५ टक्के पालकांनी एकत्र येऊन शुल्कवाढीला आव्हान देण्याची सोय विधिमंडळात संमत झालेल्या विधेयकामुळे झाली आहे. पण एवढे पालक एकत्र येणे दुरापास्त. शिवाय थेट तक्रार करणे पाल्याच्या विकासासाठी मारक ठरण्याचीही भीती. अशा स्थितीत शुल्कवाढीचा तिढा केवळ कागदोपत्रीच सुटला, असे म्हणायला हवे. दुसरीकडे खासगी विनाअनुदानित शाळांनाही शुल्क विनियमन कायद्याच्या चौकटीत आणून शासनाने पालकांना दिलासा दिला असला, तरीही त्याचा नेमका किती फायदा होईल, हे पालकच जाणोत. शिक्षणाची दारे खासगी क्षेत्राला खुली करताना दर्जाची हमी घेणे व्यवहार्य नव्हते. खासगी शिक्षणसंस्थांनी त्याचा फायदा घेतला. खासगी शाळांमधील सोयीसुविधांची स्पर्धा त्यांच्या बाजारपेठीय आकर्षणासाठी उपयुक्तही ठरली. एका बाजूला कमीत कमी शुल्क हवे आणि दुसऱ्या बाजूला शिक्षणाचा दर्जा अत्युत्तम हवा, अशी समस्त पालकांची इच्छा असली, तरीही त्याबाबत सरकारी हस्तक्षेप अनेकदा अडचणीचाच ठरणारा असतो. आता जे विधेयक संमत झाले आहे, त्यामुळे पालकांच्या जखमेवर निदान फुंकर तरी मारली जाईल, एवढेच.

माध्यमिक आणि उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमांचे शुल्क खर्चावर आधारित असते. शिक्षणसंस्थेत कोणत्या प्रकारच्या सुविधा उपलब्ध आहेत, त्यातील कोणत्या सक्तीच्या आहेत, यावर तेथील शुल्क ठरते. प्राथमिक शाळांना हेच सूत्र लागू करून तेथील शुल्काबाबत पारदर्शकता आणणे अशक्य नाही. शुल्काबाबतची मनमानी टाळण्यासाठी ते आवश्यकही आहे. प्रश्न आहे, तो पालक आणि शिक्षणसंस्थांच्या एकत्र येण्याचा. अनेक शिक्षणसंस्था शुल्काच्या नावाखाली अक्षरश: हडेलहप्पी करतात, अशी तक्रार असते. शाळेत पोहण्याचा तलाव आहे, म्हणून त्याचे वेगळे शुल्क, अत्याधुनिक प्रयोगशाळा आणि ग्रंथालय आहे, म्हणून त्याची वेगळी पावती अशा रीतीने पालकांना लुबाडले जाते अशी भावना अनेकदा खासगीत व्यक्त होते. पण त्याचा जाहीर उच्चार करण्यास पालक तयार नसतात. हे टाळायचे, तर अभ्यासक्रम शुल्क आणि सुविधांचे शुल्क अशी विभागणी करायला हवी. ग्रामीण भागातील शाळांमध्ये अशा सुविधा असतात, याचाही मागमूस नसतो. राज्यातील सगळ्या शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय करण्याचा आदेश निघाल्यानंतर सरकारी खर्चाने टाक्या उभारल्या गेल्या. पण राज्याच्या अनेक भागांतील शाळांच्या टाकीत पिण्याचे पाणीच पोहोचत नसेल, तर त्या मुलांच्या दप्तरात पाण्याच्या बाटलीचे वजन वाढणारच.

तेव्हा शुल्काचा मुद्दा असो की दप्तराच्या वजनाचा. शासनाच्या निर्णयाने तो पूर्ण साध्य होणार नाही. त्यासाठी पालकांच्याच प्रबोधनाची गरज आहे. मार्क ट्वेन याच्या काळात फक्त शाळा हाच विद्यार्थ्यांसमोरचा शिक्षणमार्गातील अडथळा होता. आता पालकही आहेत.

## दोन गावठी दारूच्या हातभट्या उद्ध्वस्त

**नवी मुंबई -** पनवेलच्या डोंगराळ भागात चालणाऱ्या गावठी दारूच्या हातभट्ट्या तसेच गांजा विक्री करणाऱ्या व्यवसायावर पनवेल तालुका पोलिसांनी छापा टाकून दोन महिलांसह चौघांना अटक केली. अवैध धंद्यावरील या कारवाईत पोलिसांनी दोन हातभट्टी उद्ध्वस्त करून गावठी दारू



बनविण्यासाठी लागणारे साहित्य त्याचप्रमाणे ४०० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला.

पनवेल तालुका पोलिस ठाण्याच्या २६५ किमीच्या विस्तीर्ण हद्दीत बराचसा भाग हा डोंगराळ आणि जंगलाचा आहे. त्यामुळे काही व्यक्ती जंगल परिसरात अवैध धंदे करत असल्याची माहिती पनवेल तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक राजपूत यांना मिळाली होती. त्यांनी विशेष मोहिमेद्वारे या धंद्यांवर कारवाई करण्यासाठी तीन पथके तयार केली होती. शुक्रवारी या तीन पथकांनी विविध ठिकाणी छापा टाकला. पोलिस उपनिरीक्षक मनेष साबळे यांच्या पथकाने कर्निक जंगलामध्ये छापा मारून गावठी दारूची हातभट्टी उद्ध्वस्त केली. तसेच दारू गाळण्यासाठी तयार केलेला कच्चा माल व रसायन नष्ट केले. त्या ठिकाणावरून एका व्यक्तीला अटक केली.

पोलिसांच्या दुसऱ्या पथकाने भल्याची वाडी गावच्या हद्दीत असलेले नवरा-नवरीच्या डोंगर परिसरात छापा मारून गावठी दारूची हातभट्टी उद्ध्वस्त केली. तसेच एका व्यक्तीला अटक केली. तिसऱ्या पथकाने भातणगाव येथील अमेठी विद्यापीठाकडे जाणाऱ्या मार्गावर गांजा विक्री करण्यासाठी आलेल्या दोन महिलांना सापळा लावून अटक केली. या कारवाईत पोलिसांनी एकूण ४०० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला आहे.

## वसईत १५६ अनधिकृत बांधकामे पाडली

**वसई : महानगरपालिका क्षेत्रात दोन दिवसांपूर्वी झालेल्या अनधिकृत बांधकामाविरोधातील कारवाईनंतर गुरुवारी सायंकाळी शासकीय जमिनीवर झालेल्या बेकायदा बांधकामांवर बुलडोझर फिरविण्यात आले. यात मोरी गावातील गाळे व रिहवासी खोल्या मिळून १५६ बांधकामे तोडण्यात आली.**



गत दोन दिवासांत वसई महसूल खात्याने वसई पूर्वेला शासकीय जमिनीवर संयुक्त रित्या बेकायदा बांधकामावर तोडू कारवाईचा बडगा उगारला आहे. हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई होत असल्याची चर्चा असून या पूर्वी त्या विरोधात कोणतीही कारवाई का नाही करण्यात आली या बाबत सवाल विचारला जात आहे.

जिल्हाधिकारी पालघर यांच्या मार्गदर्शनाने वसई प्रांतांच्या नेतृत्वाखाली मागील दोन दिवस झाले वसई महसूल विभाग, महापालिका, पोलीस, पंचायत समिती यांनी संयुक्तरित्या येथील कामण, पोमण आणि मोरी गावातील शासनाच्या नवीन शर्तीच्या जमिनीवर मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे झाली असल्याची बाब निदर्शनास आली होती.

त्यानुसार वसई प्रांत अधिकाऱ्यांनी नियोजन बद्ध रित्या बैठक घेऊन जागेवर पोलीस बंदोबस्त महसूल यंत्रणा उभी करून दि. २८ नोव्हेबर रोजी १७७ बांधकामे भुईसपाट केली तर दि.२९ नोव्हेंबर रोजी १५६ बांधकाम जमीनदोस्त करून या दोन दिवसात एकूण ३३३ बांधकामांवर बुलडोजर चढवून शासकीय जमिनी रिकाम्या केल्या असल्याची माहिती वसई प्रांताधिकारी दीपक क्षीरसागर यांनी दिली. या कारवाईत ७० हुन अधिक कर्मचारी अधिकाऱ्यांनी संयुक्त रित्या कारवाई केली.

## बलात्कारी पोलिस उपनिरीक्षक निलंबित



**ठाणे -** लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्या पीडित तरुणीवरच बलात्कार करणारा शांतीनगर पोलिस ठाण्यातील पोलिस उपनिरीक्षक रोहन गोंजारी याला निलंबित करण्यात आले आहे. गोंजारी हा अद्याप फरार असून अटकपूर्व जामिनासाठी त्याने न्यायालयात अर्जही केला आहे. परंतु आरोपीविरुद्ध पुरावेही पोलिसांच्या हाती लागले असून हे सर्व पुरावे न्यायालयात सादर केले जातील, अशी माहिती पोलिस अधिकाऱ्याने दिली.

पीडित २३ वर्षीय तरुणीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराप्रकरणी शांतीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असून या गुन्ह्याचा तपास पोलिस उपनिरीक्षक रोहन गोंजारी करत होता. प्रेमसंबंधातून शारीरिक संबंध आल्याने पुढे कोणतीही कारवाई करायची नाही, असा निर्णय पिडितीने घेतला. परंतु गोंजारी याने तुझ्या प्रियकराला सोडणार नसल्याची धमकी देत पीडितेवरच बलात्कार केला. तरुणीच्या तक्रारीनंतर कोनगाव पोलिस ठाण्यात २१ नोव्हेंबर रोजी गोंजारी याच्याविरुद्ध बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र गुन्हा दाखल होण्यापूर्वीच आरोपी फरार झाला आहे. मात्र पीडितेसोबत पोलिस अधिकाऱ्यानेच केलेल्या या गैरकृत्याची वरिष्ठांनी गंभीर दखल घेतली असून पोलिस खात्याची प्रतिमा मलीन झाल्याने गोंजारी याला निलंबित करण्यात आले आहे.

निलंबन कालावधीत खासगी नोकरी स्वीकारल्यास अथवा धंदा केल्यास कार्यवाहीस पात्र ठराल. तसेच, निर्वाह भत्त्यावरील आपला हक्क गमावून बसाल, असेही निलंबन आदेशात म्हटले आहे. तसेच, मुख्यालयातील पोलिस उपायुक्तांच्या पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडता येणार नाही. तसेच, निलंबन कालावधीत दररोज मुख्यालयात नियमित हजेरी द्यावी, असेही या निलंबन आदेशात म्हटले आहे. गुन्हा दाखल झाल्याच्या दिनांकापासून गोंजारी याला निलंबित केले आहे. कोनगाव पोलिस आरोपीचा शोध घेत आहेत.

## खानिवडे रेतीबंदरावर पोलिसांची कारवाई

**पारोळ :** पोलिसांनी रेती माफियांविरोधात मोहिम खानिवडे रेती बंदरावर कारवाई करून करून दोन बोटी जाळत रेती, ट्रक, दुचाकी असा लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई गुरु वारी करण्यात आली. मात्र, या कारवाईच्या वेळी ट्रक चालकांनी पोलिसांच्या हातावर तुरी दिल्या.

पोलीस या ठिकाणी गस्ती वर असताना खानिवडे येथील पेट्रोल पंपाजवळ रेतीची वाहतूक करणारा ट्रक पोलिसांच्या निदर्शनात आला त्यावेळी ट्रक ची तपासणी केली असता त्या मध्ये रेती असल्याचे दिसून आले. तसेच या भागात हेडवडे गावाच्या हद्दीत रेती बंदर नंबर ४ व ५ मध्ये सेक्शन पंपातून बेकायदा रेती उपसा होत असल्याचे दिसून आले. पोलिसांनी या ठिकाणी कारवाई करत दोन बोटी जाळत ५६८ ब्रास रेती, सेक्शन पंप, बोटी, दोन ट्रक, दुचाकी असा एकूण ८७ लाख ८० हजाराचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांनी बोट व ट्रक मालक यांच्या वर गुन्हा नोंद केला असून विरार पोलीस चौकशी करीत आहेत.

## ठाण्यात ३८ बालमजुरांची सुटका

**ठाणे :** मजुरीसाठी बिहारहून मुंबईच्या दिशेने आलेल्या ३८ बालकामगारांची सुटका शनिवारी पालवी चाईल्ड लाईन व प्रथम सामाजिक संस्थेच्या सदस्यांनी केली. यातील १८ मुलांची ओळख पटवून त्यांना त्यांच्या कुटुंबीयांकडे सोपविण्यात आले, तर उर्वरित २० मुलांना भिवंडी येथील बालसुधारगृहात पाठविण्यात आले आहे.



रक्सोल-मुंबई जनसाधारण एक्स्प्रेसने उत्तर प्रदेश, बिहार येथील मुले मजुरीसाठी मुंबईत आणली जातात. बिहार येथून ५८ मुलांना मुंबईत आणले जात असल्याची माहिती काही सामाजिक संस्थांच्या माध्यमातून पालवी चाईल्ड लाईन संस्था व प्रथम सामाजिक संस्थेला मिळाली होती. जनसाधारण एक्स्प्रेस लोकमान्य टिळक टर्मिनस कुर्ला या स्थानकावर थांबते; परंतु अनेकदा ही एक्स्प्रेस कल्याण अथवा ठाणे स्थानकातच रद्द करण्यात येते. त्यामुळे पालवी चाईल्ड लाईन व प्रथम सामाजिक संस्थेचे ४२ कार्यकर्ते शुक्रवारी रात्रीच कल्याण स्थानकात दाखल झाले.

कल्याण स्थानकातून गाडी पकडून त्यांनी गाडीतील मजूर मुलांचा शोध घेण्यास सुरुवात केली. ठाणे स्थानकात गाडी रद्द करण्यात आली. त्या वेळी कार्यकर्त्यांनी ३८ मुलांना ताब्यात घेतले. या मुलांना ठाणे रेल्वे पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. १८ मुलांची ओळख पटल्यानंतर त्यांना त्यांच्या कुटुंबाच्या स्वाधीन करण्यात आले, तर २० मुलांना भिवंडी बालसुधारगृहात पाठविण्यात आल्याची माहिती पालवी चाईल्ड लाईन संस्थेच्या वैशाली जाधव यांनी दिली.

## तीन लाचखोर पोलिस कर्मचाऱ्यांवर गुन्हा

**नवी मुंबई -** फिल्म एडिटिंगचे काम करणाऱ्या वाशीतील एका व्यावसायिकावर कायदेशीर कारवाई करण्याची धमकी देऊन त्याच्याकडून ६० हजारांची रोख रक्कम उकळणाऱ्या व त्यानंतर आणखी ४० हजार रुपये उकळण्याच्या प्रयत्नात असलेल्या वाशी पोलिस ठाण्यातील तीन पोलिस कर्मचाऱ्यांवर नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने कारवाई केली. यातील दोन पोलिसांना ताब्यात घेण्यात आले आहे.

यामध्ये पोलिस शिपाई संजय आगोने, पोलिस नाईक संतोष अवघडे आणि पोलिस शिपाई प्रदीप राठोड या तिघांचा समावेश आहे. तक्रारदार ज्या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून एडिटिंगचे काम करत आहे, ते



पायारेटेड आहे. तसेच तो ज्या घरात भाड्याने राहत आहे, त्या घरातून व्यावसायिक काम करता येणार नाही, असे सांगून हे तिघे त्याला धमकावत होते. या त्रिकुटाने त्याच्याकडे ३ लाख रुपये लाचेची मागणी करून १ लाखावर तडजोड केली. त्यातील ६० हजारांची रोख रक्कमदेखील स्वीकारली होती. मात्र त्यानंतर या तिन्ही पोलिसांकडून उर्वरित ४० हजार रुपयांसाठी तक्रारदाराच्या पाठीमागे तगादा लावला होता. त्यामुळे तक्रारदाराने नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. त्यानुसार तिघांवर गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहिती विभागाचे पोलिस उपअधीक्षक रमेश चव्हाण यांनी दिली. या कारवाईत पोलिस शिपाई संजय आगोने आणि पोलिस नाईक संतोष अवघडे या दोघांना ताब्यात घेण्यात आल्याचे चव्हाण यांनी सांगितले.

# राज्यातील ८२ लाख शेतकरी दुष्काळाच्या छायेत - फडणवीस

**मुंबई -** राज्यातील तब्बल ८२ लाख २७ हजार शेतकरी दुष्काळाच्या कचाट्यात असून, ८५ लाख ७६ हजार हेक्टर क्षेत्र दुष्काळामुळे बाधित झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी विधानसभेत दिली. तसेच, सध्या जाहीर झालेल्या दुष्काळी भागात राज्य सरकारने दुष्काळाबाबतचे स्थायी आदेश लागू केले असून, त्या व्यतिरिक्तही अधिकच्या उपाययोजना करण्यात येत आहेत. राज्य सरकारने केलेल्या उपाययोजनांव्यतिरिक्त केंद्र सरकारकडे दुष्काळग्रस्तांच्या मदतीचा ७ हजार ५२२ कोटींचा प्रस्ताव पाठविण्यात आल्याची माहितीही त्यांनी या वेळी दिली. विधानसभेत विरोधक आणि सत्ताधाऱ्यांनी मांडलेल्या दुष्काळाच्या चर्चेदरम्यान उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर मुख्यमंत्र्यांनी गुरुवारी



उत्तर दिले. पूर्वी दुष्काळ जाहीर करण्याची प्रक्रिया अधिकारी आणि सरकारच्या मर्जीवर अवलंबून होती. मात्र, केंद्राने तयार केलेल्या दुष्काळ संहितेमुळे दुष्काळ जाहीर करण्याच्या प्रक्रियेत सुलभता आणि अचुकता आल्याचे ते म्हणाले. सध्याचे दुष्काळी क्षेत्र हे अंतिम नसून दुष्काळ जाहीर करण्याच्या मागण्यांवर विचार करण्यासाठी मंत्रिमंडळाची एक उपसमिती तयार केले आहे. या उपसमितीकडे आलेल्या प्रस्तावांची पाहणी करून नुकसानीचे दावे योग्य असल्यास नियमानुसार तीव्र किंवा मध्यम स्वरूपाचा दुष्काळ जाहीर केला जाईल, असेही त्यांनी सांगितले. सध्या जाहीर झालेल्या दुष्काळी भागात राज्य सरकारने दुष्काळाबाबतचे स्थायी आदेश लागू केले असून, त्या व्यतिरिक्तही अधिकच्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

या अधिकच्या उपाययोजनांसाठी ३ हजार कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली असून, त्यामध्ये जनावरांसाठी चाऱ्याचे नियोजन, मनरेगांतर्गत कामे उपलब्ध करून देण्यासाठी निकष शिथिल करणे, शालेय विद्यार्थ्यांना सुटीदरम्यानही मध्यान्ह भोजन, तसेच




विंधन विहिरी आणि टँकरच्या प्रस्तावात सुसूत्रता आणणे यांसारख्या कामांचा समावेश आहे. मुख्यमंत्री म्हणाले, की पाणीपुरवठ्याच्या उपाययोजनांसाठी २०३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. शिवाय केंद्र सरकारकडून मिळालेल्या आठ हजार कोटींच्या निधीतून राज्यातील १० हजार ५८३ गावांच्या पाणीपुरवठा योजनेचा आराखडा तयार करण्यात आला असून, मे महिन्यापूर्वीपर्यंत कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न असल्याचे ते म्हणाले.

# 'केंद्र सरकारचा देशातील शेतकऱ्यांवर अन्याय'

**नवी दिल्ली-** केंद्रातील मोदी सरकारने देशातील शेतकऱ्यांवर प्रचंड अन्याय केला आहे. आतापर्यंत जे झाले ते पुरे. यापुढे आम्ही गप्प बसणार नाही. ७ हजार कोटी बुडवणाऱ्या उद्योगपतींना सरकार कर्जमाफी देते पण गरीब शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यास सरकारकडे पैसे नाहीत, या सरकारला धडा शिकवावाच लागेल, असा इशारा माजी केंद्रीय कृषिमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज केंद्र सरकारला दिला. देशभरातून आलेल्या शेतकऱ्यांच्या मोर्चात ते बोलत होते. कर्जमुक्ती, हमीभाव, वनहक्क कायदा अशा अनेक मागण्यांसाठी देशभरातील शेतकऱ्यांचा मोर्चा दिल्लीत धडकला आहे. या मोर्चासाठी देशभरातून अनेक शेतकरी नेत्यांनी हजेरी लावली आहे. या मोर्चाला देशातील २१ राजकीय पक्षांनी पाठिंबा दिला आहे.

या सर्व पक्षांच्या नेत्यांनी एकत्र येऊन संसद मार्गावर जनसंसद भरवली. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष राहुल गांधी, सीपीएम नेते सीताराम येचुरी, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, योगेंद्र यादव, सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर, समाजवादी नेते धर्मेंद्र यादव, तृणमूलचे नेते दिनेश त्रिवेदी, जेडीयू नेते शरद यादव, गुजरातचे आमदार जिग्नेश मेवाणी आदी नेत्यांनी या किसान संसदेला हजेरी लावत मोदी सरकारवर हल्लाबोल केला.



देशभरातून आलेल्या शेतकऱ्यांचा मोर्चा आज अखेर संसद मार्गावर धडकला. सकाळी दहाच्या सुमारास शेतकऱ्यांनी रामलीला मैदानावरून कूच केली. पावणेबाराच्या सुमारास हा मोर्चा संसद मार्गावर पोहोचला. यावेळी देशभरातून आलेल्या सर्व शेतकरी नेत्यांनी जमलेल्या शेतकऱ्यांना संबोधित केले. हा मोर्चा म्हणजे सरकारला दिलेला अल्टिमेटम आहे असा सूर सर्वच नेत्यांच्या भाषणातून उमटला. ७००० कोटी बुडवणाऱ्या उद्योगपतींना सरकार कर्जमाफी देते पण गरीब शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यायला या सरकारकडे पैसे नाहीत.

# सलाईनद्वारे विवाहितेच्या शरीरात एचआयव्हीचे विषाणू सोडले

**पिंपरी-** माहेरहून पैसे आणण्यासाठी विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केला. घटस्फोट मिळवण्यासाठी विवाहितेच्या शरीरात एचआयव्हीचे विषाणू सोडण्यात आले. असा धक्कादायक प्रकार पिंपरी चिंचवड शहरातील थेरगाव परिसरात उघडकीस आला आहे.

या प्रकरणी पिंपळे सौदागर परिसरात राहणाऱ्या २७ वर्षीय विवाहितेने वाकड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार, महिलेचा पती, सासरा आणि सासू या तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिलेचा विवाह मे



२०१५ मध्ये झाला. तेव्हापासून आरोपींनी आपसात संगनमत करून महिलेकडे माहेरहून पैसे आणण्याचा तगादा लावला होता. आरोपींनी वारंवार पैशाची मागणी करून महिलेस मारहाण देखील केली. महिलेने पैसे देण्यास नकार दिल्याने तिच्याकडे घटस्फोटाची मागणी करण्यात आली. दरम्यान, महिला आजारी असताना आरोपींनी सलाईनमधून तिच्या शरीरात एचआयव्हीचे विषाणू सोडले. त्यामुळे महिला एचआयव्ही बाधीत झाली आहे. पुढील तपास उपनिरीक्षक संगीता गोडे करीत आहेत.

# महाराष्ट्रातील मुस्लिमांना आरक्षण द्या -ओवेसी

**अहमदाबाद-** महाराष्ट्रात मराठा, गुजरातमध्ये पाटीदार समाजाने आरक्षणाची मागणी केल्यानंतर आता राजपूत आणि ब्राह्मण समाजानेही आरक्षणाची मागणी केले आहे. महाराष्ट्रात मराठा समाजाचा आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे. महाराष्ट्रातील मुस्लिम समाजाला आरक्षण द्या अशी मागणी AIMIM चे अध्यक्ष आणि खासदार असादुद्दीन ओवेसी यांनी आज केली. आरक्षण न दिल्याने महाराष्ट्रातील मुस्लिम समाजावर अन्याय होत आहे, असा आरोप



त्यांनी ट्विटरवरून केला आहे.

महाराष्ट्रातील मुस्लिम समाजाला आरक्षण मिळावे. हा त्यांचा अधिकार आहे. रोजगार आणि शिक्षणात मागास मुस्लिमांना आरक्षणापासून वंचित ठेवणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय करण्यासारखे होईल, असे ओवेसी म्हणाले. मुस्लिम समाजात मागास जाती आहेत त्या अनेक वर्षांपासून गरिबीत आपले जीवन जगत आहेत. आरक्षण देऊन या समाजाला मुख्य प्रवाहात आणता येईल, ही मागणी मी वेळोवेळी केली आहे, असं म्हणत त्यांनी ट्विटरवर एक व्हिडिओही पोस्ट केला आहे. महाराष्ट्रात मुस्लिम समाजाला आरक्षणाची गरज आहे का? असा सवाल विचारून त्यांनी एक व्हिडिओ शेअर केला आहे. महाराष्ट्रात एकूण लोकसंख्येत ११.५ टक्के मुस्लिमांची संख्या आहे. यातील ६० टक्के मुस्लिम दारिद्रेरेषेखाली आपले जीवन जगत आहेत, असा दावा ओवेसी यांनी यावेळी केला.


# १६ टक्के मराठा आरक्षणानुसार २४ हजार शिक्षकांची भरती होणार

मुंबई- मराठा आरक्षणाचा कायदा मंजूर होण्याआधी शिक्षक भरतीचा निर्णय घेतला असला तरी शिक्षक भरतीत १६ टक्के मराठा समाजाला राखीव जागा ठेवण्यात यावी, अशी मागणी भाजप आमदार ॲड. आशिष शेलार यांनी विधानसभेत केली. ती शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी मान्य केली.

विधानसभेत आज शिक्षक भरतीचा विषय तारांकित प्रश्नात उपस्थित झाला. या चर्चेत सहभागी होताना, मुंबई भाजप अध्यक्ष आमदार ॲड. आशिष शेलार यांनी शिक्षक भरतीचा निर्णय पूर्वी झाला असला तरी मराठा समाजला १६ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय काल २९ नोव्हेंबर रोजी झाला. हा कायदा लागू करून शिक्षक भरती करण्यात यावी आणि त्यामध्ये मराठा समाजाच्या १६ टक्के जागा राखीव ठेवण्यात याव्यात, अशी मागणी आमदार शेलार यांनी केली.

त्यावर उत्तर देताना सांगितले की, होत असलेल्या २४ हजार ऑनलाइन शिक्षक भरतीमध्ये १६ टक्के मराठा समाजाला आरक्षणाचा लाभ मिळेल आणि ही शिक्षक भरती वेळेत पूर्ण होईल याबाबत सरकार काळजी घेईल, अशी घोषणा शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी केली.

दरम्यान, राज्य सरकारने पूर्वीच



राज्यात २४ हजार शिक्षकांची पदे भरणार असल्याचे जाहीर केले आहे. पारदर्शी भरतीसाठी बनवण्यात आलेल्या पवित्र पोर्टलच्या माध्यमातून भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली. परंतु, संस्थाचालकांनी न्यायालयात धाव घेतली. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने या प्रकरणीच्या सुनावणीत भरतीचा अधिकार संबंधित संस्थेलाच असणार असल्याचा निर्णय दिला. त्यामुळे सरकारच्या पारदर्शी भरती प्रक्रियेच्या घोषणेवरून डी.एड., बी.एड. धारकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

# घरगुती गॅस सिलिंडर दरात कपात

**नवी दिल्ली-** घरगुती अनुदानित गॅस (एलपीजी) सिलिंडर दरात ६ रुपये ५२ पैशांनी कपात करण्यात आलेय. तर विनाअनुदानित गॅस सिलिंडर दरात १३३ रुपयांनी स्वस्त करण्यात आलाय. एलपीजी सिलिंडरची किंमत सहा महिन्यांनंतर कमी केली गेली आहे. जून २०१८ पासून एलपीजीच्या किमती वाढत होत्या. १ नोव्हेंबर रोजी आयओसी सब्सिडीमध्ये एलपीजी सिलिंडरमध्ये वाढ २.९४ रुपयांनी वाढली होती. आयओसीने म्हटले आहे की, नॉन-सबसिडीड एलपीजी सिलिंडरची किंमत १३३ रुपये कमी करण्यात आली आहे.



आंतरराष्ट्रीय पातळीवरील क्रूड ऑइलच्या किंमती कमी झाल्यामुळे एलपीजीच्या किमती कमी झाल्या आहेत. दिल्ली अनुदानित १४.२ किलोचा गॅस सिलिंडर ८०९.५० रुपयांत मिळेल. १ डिसेंबरपासून नवीन किमती लागू होती. आतापर्यंत ९४२.५० रुपये किंमत होती. एका वर्षात, केवळ १२ सिलिंडर प्रत्येक कुटुंबाला सबसिडीसह मिळतात. त्यानंतर, बाजार दराने सिलिंडर खरेदी करावा लागतो.

# पोलिस निरीक्षकावर कारवाई करा

**पंढरपूर :** पोलिस निरीक्षक धनंजय जाधव आणि पोलिस नाईक आरकिले या दोघांच्या त्रासाला कंटाळूनच राहुल जगताप याने विषारी औषध पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे या दोघांवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा तत्काळ दाखल करावा. अन्यथा, पोलिस ठाण्यासमोर आत्मदहन करू, असा इशारा राहुल जगताप याचे वडील शिवाजी जगताप आणि राहुलच्या पत्नीने दिला आहे.

कॉन्स्टेबल राहूल जगताप याने, पोलिस निरीक्षक आणि एक पोलिस नाईक आपणास त्रास देत असल्याने आत्महत्या करीत असल्याची पोस्ट सोशल मीडियावर टाकून झाला होता. १ डिसेंबर रोजी राहूल भाळवणी येथे अत्यवस्थ अवस्थेत सापडला. सोगोर नावाचे विषारी औषध पिऊन त्याने आत्महत्येचा प्रयत्न केला असून त्याच्यावर येथील लाईफलाईन रुग्णालयातील अतिदक्षता विभागात त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

दरम्यान, या प्रकाराबाबत राहूल याचे वडील शिवाजी जगताप यांनी रविवारी पत्रकारांशी बोलताना



पोलिस निरीक्षक धनंजय जाधव आणि कॉन्स्टेबल नाईक आरकिले यांच्यावर गंभीर आरोप केले. राहूल हा आत्महत्येचा इशारा देऊन बेपत्ता झाल्यानंतर पोलिसांनी कसलाही शोध घेतला नाही, साधी चौकशीही कोणाकडे केली नाही. वेळीच तो सापडला असता तर ही वेळ आली नसती. पोलिस निरीक्षक जाधव आणि पोलिस नाईक आरकिले हे दोघे गेल्या तीन महिन्यांपासून त्रास देतात, असे राहूल नेहमी म्हणायचा. अखेर या त्रासाला कंटाळूनच त्याने आत्महत्येचा प्रयत्न केला आहे. त्याच्या जीवाचे बरेवाईट झाल्यास आम्ही काय करायचे ? त्यामुळे जाधव व आरकिले यांच्यावर त्वरित गुन्हा दाखल करून कडक कारवाई झाली पाहिजे. आम्हाला न्याय न मिळाल्यास, पोलिस ठाण्यासमोर आम्ही सहकुटूंब आत्मदहन करू असा इशारा शिवाजी जगताप व राहुलच्या पत्नीने दिला आहे.

यावेळी पोलिस निरीक्षक जाधव खोट्या डायरी आणि हजेरीसाठी नेहमी आपल्या पतीला त्रास देत असत. त्यामुळे आपण गरोदर असताना दवाखान्यात घेऊन जाण्यासाठीही पती कधी वेळ देऊ शकले नाहीत. त्यामुळे घरी पोलीस निरीक्षक जाधव यांचा विषय निघायचा असे सांगून राहूल जगताप याच्या पत्नीने पोलीस निरीक्षक जाधव यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

### *दुसऱ्या दिवशीही राहुल बेशुद्धावस्थेत*

शनिवारी रात्री ७ च्या सुमारास विषारी औषध पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या राहुलवर येथील लाईफलाईनमध्ये उपचार सुरू असले तरी दुसऱ्या दिवशीही राहुलची प्रकृती अत्यवस्थ असून राहुल गंभीर असल्याचे डॉक्टरकडून सांगण्यात येते. त्यामुळे राहुलच्या कुटुंबीयांकडून चिंता व्यक्त होत आहे.

# पश्चिम उपनगरातील हवा गर्भवती महिलांना मॉर्निंग वॉकसाठी धोकादायक

**मुंबई - ठाणे :** - सध्या मुंबई, नवी मुंबई ,ठाण्यासह परिसरात मोठ्या प्रमाणावर धुक्याचे साम्राज्य पसरत आहे. परंतु या धुक्यामध्ये वाहनांचा धूर मिसळत असल्याने क्रोनिक ऑब्स्ट्रॅक्टिव्ह पल्मनरी डिसीज (सीओपीडी) अर्थात काळ्या दम्याच्या श्वसनविकाराच्या गंभीर आजाराचा विळखा गरोदर महिलांना पडत असल्याचे निरीक्षण बोरीवली येथील अपेक्स ग्रुप ऑफ हॉस्पिटलने नोंदवले आहे. मुंबई , ठाणे व पश्चिम उपनगरांत आठ ते दहा दिवसापासून वातावरणातील गारवा वाढला आहे. उत्तर-पूर्वेकडून थंड हवा आणि पश्चिमेकडून येणारी उबदार हवा यांच्या मिश्रणामुळे धुक्याचं सावट निर्माण होत आहे. थंडीत पडणारे धुके हे नैसर्गिक आहे. परंतु दिवसरात्र शहरातील प्रमुख रस्ते, उपनगरांना जोडणारे रस्ते अक्षरश: हजारो वाहने ये -जा करीत असल्यामुळे वाहनातून निघणारा धूर या धुक्यात मिसळल्यामुळे 'स्मॉग' तयार होत असून, याचा गंभीर परिणाम गरोदर मातांवर होत असून जन्मजात बालकांनाही याचा त्रास होऊ शकतो.



याविषयी अधिक माहिती देताना बोरीवली येथील अपेक्स मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलचे पल्मोनोलॉजिस्ट डॉ पार्थिव शहा म्हणाले, 'गरोदर मातांमध्ये प्रतिकारक शक्ती कमी असल्यामुळे त्यांना थंडीमध्ये वारंवार सर्दी, पडसे, खोकला, ताप व कीटकांपासून होणाऱ्या आजारांची लागण लगेच होऊ शकते. घरामधील चादरी , खिडक्यांचे पडदे तसेच घरात येणारी धूळ यामधूनसुद्धा अनेक गर्भवती महिला व जन्मजात बालकांना ॲलर्जी अथवा जंतुसंसर्ग होऊ शकतो. याचसोबत सध्या मोठ्या प्रमाणात तयार होत असलेल्या स्मॉगमुळे गरोदर महिलांमध्ये धाप लागणे, छातीत जळजळ होणे तसेच न्युमोनियाची लागण होऊ शकते व अशा प्रकारच्या पेशंटची संख्या येत्या काळात वाढणार आहे. वातावरणात असलेला हा स्मॉग श्वसन मार्ग, सायनस आणि अनुनासिक पोकळी उपनिर्मित करतो व त्यामुळे रोगप्रतिकारकशक्ती कमी असलेल्या व्यक्तींमध्ये रोगजन्य जीवाणू पसरू शकतात, एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीमध्ये हे जीवाणू श्वसनमार्गे पसरतात. अशा स्थितीमध्ये गरोदर महिलांना जास्त ताकदीची औषधेसुद्धा देऊ शकत नसल्यामुळे त्यांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार 'आजीबाईच्या बटव्यामधील' औषधे वापरण्यास काहीच हरकत नाही. गरोदर महिलांची नॉर्मल प्रसूती होण्यासाठी त्यांना मोकळ्या हवेत चालण्याचा सल्ला दिला जातो. परंतु सध्याची दूषित वातावरणाची परिस्थिती पाहता त्यांनी घरातल्या घरातच चालणे फायद्याचे ठरेल.'

दिवाळीनंतर पश्चिम उपनगरातील हवेचा दर्जा खालावू लागला आहे. ११ नोव्हेंबर नंतर अंधेरीत सर्वाधिक प्रदूषण नोंदवण्यात आले असून, त्या खालोखाल मालाड परिसरातील हवा खराब असल्याचे नोंद झाले. अंधेरीत तरंगत्या धूलिकणाचे प्रमाण ३७८ मायक्रोग्रॅम प्रत्येक क्युबिक मिटर नोंदविण्यात आले होते . बोरिवलीतील हवा अंधेरी, मालाडपेक्षा कमी दूषित आहे; मात्र हवा धोकादायक आहे, असा अंदाज सफरने व्यक्त केला.

**- उमेश भोगल**

# दोन हजाराच्या नवीन नोटा चलनातून रद्द होणार?



**मुंबई-** देशात दोन हजाराच्या चलनाची संख्या व्यवहारातून कमी होत आहे. त्यात दोन हजारांच्या नोटांची छपाई पूर्णत: थांबविल्याने दोन हजारांच्या नोटा बंद होतील की काय? याबाबत नागरिकांमध्ये चर्चा जोर धरू लागलीय. त्यात दोन हजारांच्या कोट्यवधी बनावट नोटा विविध राज्यात पोलिसांच्या छाप्यात सापडत आहेत. या नोटांचे चुकीचे रंग, उडणारे पुसट रंग आणि नोटा छापण्यातही मोठ्या चुका होत्या. एका चॅनेलने रंगातील फोलपणा उघड केला होता. देशाचं सर्वात महागडं चलन नाशिकच्या करन्सी नोट प्रेसमध्ये न छापता आरबीआयच्या नवीन प्रेसमध्ये छापण्यात आलं. याबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आलं होतं. त्यामुळे नोटा न छापण्या मागची कारणे काय काय हे सरकारनं स्पष्ट करणं गरजेचं आहे.

अखिल भारतीय मानव अधिकार युनियन
सभासद नोंदणी सुरु
अध्यक्ष : श्री. दिपक मोरेश्वर नाईक मो. ८४२४९८९८९८
सचिव : श्री. विनोद दशरथ मेढे मो. ८६९२०१११९०
सदस्य नोंदणी कार्यालय - २, राजाराम अपार्टमेंट.
बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), ठाणे - ४०१ १०५

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)